ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 6 | Dec - 2015

Golden Research Thoughts

भास्कर चंदनशिव यांच्या नवी वारुळ संग्रहातील दलित कथा : परिवर्तनाचा अविष्कार

स्मिता दत्ताराव बगाटे
पी.एच.डी. संशोधक विद्यार्थीनी ,सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

स्मिता दत्ताराव बगाटे

प्रस्तावना :-

१९६० नंतर उदयास आलेल्या दलित व ग्रामीण साहित्यात १९७० ते १९९० या दशकामध्ये अमुलाग्र बद्दल घडून आला. या काळामध्ये शिक्षणाचा प्रसार जोमाने सुरु झाला. नव नवे बदल ग्रामीण व दलित समाजात घडून आले. या बदलांचा वेध ग्रामीण व दलित साहित्याने घेतलेला दिसून येतो. जन्माने दलित असणारे लेखक विद्रोह व प्रक्षोम जाणिवेने दलित जीवनाचे चित्रण दलित साहित्या मधून करु लागले होते. या दलित लेखकांबरोबरच ग्रामीण लेखकही दलित जीवनाचे चित्रण आपल्या □था वाड:मयाव्दारे करु लागला. कारण दलित समाज हा ग्रामीण समाजाचाच घटक असल्याने □ामीण कथाकारांच्या लेखनातून हा समाज सुटू श□ला नाही. जयवंत दळवी, मधु मंगेश □र्णिक, अरुण साधू, र. वा. दिघे, भालचंद्र नेमाडे, सदा क-हाडे, शंकर पाटील, चारुता सागर, राजन गवस, भास्कर चंदनशिव इ. दलितेतर ग्रामीण कथाकारांनी दलित जीवनाचे चित्रण आपल्या कथा व्दारे केलेले दिसून येते.



वरील कथाकारांपैकी भास्कर चंदनशिवांच्या □थांमधून दलित जीवनाचा मोणपट उलगडत □ला आहे. ग्रामीण साहित्य विश्वातील नामवंत ले□□ म्ह□-न मराठी साहित्य विश्वाला परिचयाचे आहेत. ग्रामीण समाजातील बारकावे भास्कर चंदनशिवांनी अत्यंत सुक्ष्मपणे आपल्या □थांमधून टिपले आहेत. त्यामुळेच ग्रामीण जीवनाचाच घटक असणारा दलित समाज त्यांच्या नजरेतून सुटू शकला नाही. त्यामुळेच त्यांच्या बहुतांशी कथा हया दलित जीवनावर आधारित आहेत. दलित समाजातील बदलांचा वेध भास्कर चंदनशिवांनी घेतला आहे. म्हणूनच प्रा. मधु सावंत म्हणतात, "चंदनशिव यांची कथा □ामीण दलित जाणिवेची समर्थ कथा आहे." डॉ. मधु सावंत यांचे वरील वक्तव्य अगदी समर्पक आहे.

वर्षानुवर्षापासून उच्चवर्णीय समाजाचा दास म्हणून जीवन जगणा-या दलित समाजाचे आत्मभान जागृत करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरीत झालेला व आपल्यावर होणा-या अन्याया विरोधात आवाज उठवणारा जागृत दलित समाज भास्कर चंदनशिवांच्या दलित कथांमधून चित्रित झालेला आहे. चंदनशिवांच्या विशेषत: '-नवी वारुळ' या □था संग्रहामधून आत्मभान जागृत होवून अन्याया विरोधात आवाज उठवणारा दलित नायक चित्रित झालेला आहे. त्यामुळेच दलित समाजातील बदलांचा वेध घेणारा कथासंग्रह म्हणून २.'-नवी वारुळ' या संग्रहाचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. दलित समाजातील परिवर्तनाचे पडसाद या कथासंग्रहा मधून पडलेले जाणवतात. डॉ. मधु सावंत आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, "प्रा. भास्कर चंदनशिव यांनी लेखन करुन बहुजन समाजाला अज्ञाननिद्रेतून जागे करण्याचा प्रयत्न केला आहे." नवी वारुळ या कथासंग्रहातील 'माती' 'सं□र' '-नवं वारुळ' या कथांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरीत झालेले -नाय□ भास□र चंदनशिवांनी चित्रित केले आहेत.

आपल्यावर होणा-या अन्यायाविरोधात प्रस्तापित समाजव्यवस्थे विरोधात विद्रोह करताना या कथेतील नायक दिसून येतात. 'माती' □थेतील नायक हरिबा हा गावात मिळणाचा अस्पृश्यतेच्या वागणूकीमुळे व दारिद्रयामुळे कंटाळून वीस वर्षापुर्वी मुंबईस जातो. वीस वर्षानंतर आपल्या गावी परतलेला हरिबाला गावातील भौतिक सुधारणा झालेल्या बघून आनंद होतो. गावात जसे भौतिक परिवर्तन झाले तसेच परिवर्तन लोकांच्याही विचारात इ

ाले असेल असा विचार करत असतानाच गावचा सवर्ण सभापती हरिबाला घरी घेवून जातो. तेथे हरिबाला हॉटेलातला चहा ठेवणीतल्या बशीतून दिला जातो तेव्हा मात्र आंबेडकरी विचारांनी प्रेरीत असलेल्या हरिबाचा आलसन्मान जागृत होतो. आजही उच्चवर्णीयांच्या संकुचित विचारात बदल झाला -नाही हे त्याला ठेवणीतल्या कपावरुन लक्षात येते. तो कप तसाच भिरकावून हरिबा तेथून निघून जातो. हरिबाच्या या अवस्थेचे वर्णन करताना भास्कर चंदनशिव म्हणतात, "तसा त्यो झटक्यात उठला अन् पोराच्या हातातली बशी रस्त्यावर फेकून तीरा सारखा निघून गेला ------ वाटेवरुन चालताना माती पूर्वी सारखीच पायाला चटके देत होती. गावची माती काहीच बदलली नव्हती ------ ?------ ." ३.बालपणीचा हरिबा अस्पृश्यतेचे चटके सहन करतो. पंरतु वीस वर्षे मुंबईत राहिलेला व आंबेडकरी विचारांनी प्रेरित असलेला हरिबा जातीयतेच्या नावाखाली होणारी अवहेलना सहन करु शकत नाही. त्यामुळे जातीयतेबाबत असणारी चिड तो हातातला कप भिरकावून व्यक्त करतो. 'माती' या कथेतून संकुचित जातीयवादी मानसिकते विरोधात आंबेडकरी विचारांना उभे केले आहे.

संगर या कथेतून भास्कर चंदनशिवांनी प्रा. कांबळे सरांच्या व्यक्तिचित्रणातून व नामांतर चळवळीच्या माध्यमातून दलित समाजातील परिवर्तन चित्रित केलेले आहे. उच्चवर्णीयांच्या संस्थेत नौकरी करुनही प्रा. कांबळे सरांनी आपल्या विचारांशी कधी तडजोड केली नाही. दलित असल्याकारणाने त्यांच्या सहकार्यांनी त्यांच्याशी कधी सलगी दाखवली नाही. तरी ते डगमगले नाही. संस्थेच्या वरिष्ठांच्या जुलूमापुढे, अन्यायापुढे व धकक्यापुढे ते कधी झुकले नाही. उलट नामांतर काळात मराठावाडा बंदच्या दिवशी 'महाड येथील धर्मसंगर' ही पाठ ते मुलांना शिकवतांना आपले आंबेडकरी विचार व नामांतरवादी विचार परखडपणे व्यक्त करतात. त्यांच्या या विचारांमुळे त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडले जाते. तरीही ते आपल्या विचारांशी तडजोड □रत नाही.

चंदनशिवांनी प्रा. कांबळेसरांसारखे परिवर्तनवादी विचारसरणीचे नायक आपल्या कथांमधून चित्रित केले आहे. तसेच या बरोबरच उच्चवर्णीय संकुचित मानसिकताही समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. दलित समाजातील तरुण शिक्षण घेवून मोठ मोठया पदावर कामे करु लागलेत. पण □वळ ते दलित आहे या कारणाने उच्चवर्णीय समाज त्यांना प्रतिष्ठा मिळू देत नाही याचे प्रत्यंतर संगर कथेतून येते. त्यामुळे उच्चवर्णीय समाजाने आपली जातीयवादी संकुचित विचारसरणी बदलली पाहिजे असा परिवर्तनवादी विचार भास्कर चंदनशिवांनी संगर कथेव्दारा मांडलेला आहे. असे जाणून येते.

भास्कर चंदनशिवांची नवं वारुळ ही कथा धरणग्रस्त, विस्थापितांचे नविन अधोरेखीत करीत असली तरी या कथेच्या माध्यमातून उच्चवर्णीय समाजाची दलितांप्रतीची संकुचित मानसिकता व या मानसिकते विरोधात दलित समाजातील नव्या पिठीचा विद्रोह या कथेतून दिसून येतो. धरणग्रस्त विस्थापित गावातील लोक माळरानावर आपलं नवं गाव वसवतात. शासन नियमानुसार हे आदर्श गाव बनवल जाणार होत. या गावात जातीयतेला धारा नव्हता. बंधुभाव व समतेवर आधारित हे नव गाव होत. परंतू या गावातील उच्चवर्णीय लोकांना हे मान्य नव्हत नुरसटलेल्या विचारांचे लोक शासननियम धाब्यावर बसवून जातिनिहाय गावची रचना करतात. महार- मांगाची घरे बाजूला तयार होतात. गावच्या नावाच्या उद्घाटनाला आलेल्या मंत्र्याच्या गावची नवी रचना बघून वाईट वाटते ते भाषणात म्हणतता, "आजच्या नव्यातून तरी अपेक्षा नव्हती. आपण विकास योजनेच्या नावान या माळरानावर आला आहात. परंतु येताना तरी जुन्या व्यवस्थेची कात तिथंच टाकून याल अशी भावना होती. परंतू कागदपत्रावरील प्लॉटिंगची रचना आणि प्रत्यक्षातल गाव पाहून आपण कोणत्या काळात आहात ? आपली गती कुठे जात आहे? " ४. मंत्र्याच्या भाषणाने दलित तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. त्यांना आपल्या समाजावर होणा-या अन्यायाची जा□ीव झाली. शासनाने अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रयत्न करुनही ही सनातनी समाजव्यवस्था दलितांना त्यांच्या बरोबरीचे स्थान दयायला तयार नाही. ज्या गावात अस्पृश्यतेला स्थान असून समतेला वाव नाही त्या गावचे नाव 'समता नगर' कसे असू शकेल या विचारातून सटवा कांबळेचा नव्या विचारांचा मुलगा 'समता नगर' नावाच्या पाटीला डांबर फासतो. व उच्चवर्णीय वर्चस्वाविरोधात विद्रोह करतो. शिक्षित दलित तरुण आपल्या हक्कासाठी व न्यायासाठी झगडत आहेत हे भास्कर चंदनशिवानी या कथेव्दारा चित्रित केले आहे.

भास्कर चंदनशिवांच्या '-नवी वारुळ' या कथासंग्रहातील दलित कथांमधून परिवर्तनाच्या पाऊल खुणा स्पष्ट होताना दिसून येतात. या कथांमधील नायक शोषणा विरोधात लढणारे आहेत. अन्यायाचा प्रतिकार करणारे आहेत. डॉ. मधु सावंत म्हणतात, "समाज परिवर्तनामुळे, नव्या पिढीत विद्रोहाची ठिणगी पडलेली आहे." ५. कारण समाज परिवर्तनाचे अग्रणी असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरीत अस□ारे नायक हे सनातनी समाजव्यवस्थे विरोधात विद्रोह करताना दिसून येतात.

संदर्भ :-

१. □थाकार भास्कर चंदनशिव - डॉ. मधु सावंत, संगत प्रकाशन, नांदेड, दुसरी आवृत्ती जानेवारी २००६, पृष्ठे - १६
२. तत्रैव - पृष्ठे - ३९
३. □थासं□ह - -नवी वारुळ (□था- माती) - भास्कर चंदनशिव - अनुपम प्रकाशन- औरंगाबाद- प्रथमावृत्ती १९९२ - पृष्ठे - ४१
४. तत्रैव (कथा - नव वारुळ) पृष्ठ - १४८
५. □था□ार - भास्कर चंदनशिव - डॉ. मधु सावंत, सं□त प्रकाशन, नांदेड, दुसरी आवृत्ती जानेवारी २००६, पृष्ठे - ४५